आकाशवाणी नागपूर,
प्रादेशिक वृत्त विभाग
प्रादेशिक बातम्या (मराठी–वेळ सायंकाळी ०६.००)
शुक्रवार दिनांक १० जानेवारी २०२५

ठळक बातम्या

1. पक्षीय राजकारणापलीकडे जाऊन राज्याच्या हितासाठी कामकरण्याची प्रेरणा महाराष्ट्रातल्या जुन्या पिढीच्या नेतृत्वानं दिली असल्याचं मुख्यमंत्र्यांचं प्रतिपादन.
2. भंडारा जिल्हा पोलिसांनी सायबर क्राईम रोखण्याकरता AI चा वापर करत तयार केला सायबर बॉट, राज्यातील पहिला प्रयोग भंडारा जिल्हयातून सुरू.
3. नागपूर महानगरपालिकेच्या कर्मचारी भरती प्रक्रिया पुढच्या महिन्यात राबवणार - मनपा आयुक्त आणि प्रशासक डॉ.अभिजित चौधरी यांची माहिती.
4. दक्षिण मध्य क्षेत्र सांस्कृतिक केंद्राद्वारे आयोजित केला जाणारा 'ऑरेंज सिटी क्राफ्ट मेळा आणि लोकनृत्य सोहळा' आजपासून सुरू.

मुख्यमंत्री

पक्षीय राजकारणापलीकडे जाऊन राज्याच्या हितासाठी काम करण्याची प्रेरणा महाराष्ट्रातल्या जुन्या पिढीच्या नेतृत्वाने दिली असल्याचं प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केलं आहे. राज्याचे दुसरे मुख्यमंत्री मारोतराव कन्नमवार यांच्या शतकोत्तर रौप्यमहोत्सवी जयंतीनिमित्त आज चंद्रपूरमधे आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. विदर्भाच्या विकासाकरता कन्नमवार यांनी केलेल्या कार्याचा गौरव फडणवीस यांनी यावेळी केला.

*दादासाहेब कन्नमवार यांच्यासारखा एक नेता आणि सातत्याने आपल्या जिल्ह्याचा आपल्या राज्याचा विकास झाला पाहिजे. हा ध्यास घेऊन एक व्रतस्थ अशा प्रकारचं जीवन ते सातत्याने जगले आणि म्हणूनच अशा प्रकारच्या नेत्याचा समाजाला विसर पडू नये. समाजामध्ये अशा प्रकारचे जे नेते असतात. हेच खऱ्या अर्थानं पुढच्या पिढ्यांना प्रेरणा देत असतात.*

विदर्भातल्या नेत्यांना एकत्रित करणे, इथल्या चळवळींना पाठींबा देणे आणि त्यात सहभागी होणे यात कन्नमवार अग्रस्थानी असल्याचे गौरवोद्गार काढून, अशा कार्यक्रमांच्या माध्यमातून त्यांचे कार्य युवा पिढीपर्यंत पोहचवणे महत्वाचे असल्याचे ते म्हणाले.

भारत युवा नेतृत्व संवाद २०२५

विकसित भारत युवा नेतृत्व संवाद २०२५ नवी दिल्लीत भारत मंडपम इथे आजपासून सुरुवात होत आहे. विकसित भारताच्या निर्माणाकरिता, तरुणांना नाविन्यपूर्ण संकल्पना सादर करण्यासाठी व्यासपीठ मिळवून द्यावं हे या उपक्रमाचं उद्दिष्ट आहे. देशभरातून सुमारे ३० लाख युवक युवतींनी यात सहभाग नोंदवला असून आजच्या परिषदेत सहभागी होण्यासाठी एकंदर तीन हजार युवक युवतींची निवड करण्यात आली आहे. विकसित भारताशी निगडीत विषयांवर सादरीकरण आणि स्पर्धांमध्ये हे युवा सहभागी होतील.

अश्विनी वैष्णव

मेक इन इंडिया योजनेंतर्गत केंद्र सरकार खासगी कंपन्यांच्या सहकार्याने रेल्वेगाड्यांच्या चाकांची निर्मिती करणार असल्याची माहिती केंद्रीय मंत्री अश्विनी वैष्णव यांनी आज दिली.

तामिळनाडूमध्ये तिरुवल्लूर इथे दोन कंपन्यांच्या चाक निर्मिती विभागांना भेट दिल्यानंतर ते माध्यम प्रतिनिधींशी बोलत होते. सध्या रेल्वेला ८० हजारांहून अधिक उच्च शक्तीच्या चाकांची गरज आहे. त्यामुळे पुढच्या वर्षीपासून या निर्मितीला सुरुवात होईल. या चाकांचा वापर देशांतर्गत रेल्वे गाड्यांसाठी केला जाईल, तसंच इतर देशांमध्येही त्याची निर्यात केली जाईल, असंही ते यावेळी म्हणाले.

सायबर बॉट

भंडारा जिल्हा पोलिसांनी सायबर क्राईम रोखण्याकरता AI अर्थात कृत्रिम बुद्धिमतेचा वापर करत 'सायबर बॉट' तयार केला आहे. सायबर क्राईमवर लगाम लावण्यासाठी याची मदत होणार असून राज्यातील पहिला प्रयोग भंडारा जिल्हयातून सुरू झाला आहे. हा सायबर बॉट कसा काम करेल हे जाणून घेऊया भंडाऱ्याचे पोलीस अधिक्षक नुरुल हसन यांच्याकडून ....

*सायबर क्राइमवर आळा बसण्यासाठी भंडारा पोलिसांनी एक आर्टिफिशियल इंटेलिजन्स बेस्ड एक सायबर बॉट लॉन्च केलेला आहे. इनिशियली हे व्हॉटस अप बेस्ड आहे आणि याच्या माध्यमातून सायबर कोणासोबत जर काही सायबर अपराध घडला तर आम्ही कुणाकडे जाऊ, कुणाकडून मदत घेऊ, तर यासाठी भंडारा पोलीस सायबर बॉट आपली मदत करणार. याचे दोन फायदे होणार एकतर आपण आपल्याला सायबर अवेरनेसबद्दल जनजागृती मिळेल, दुसरा आपल्याला काही आपल्यासोबत अपराध घडला तर काय स्टेप घेऊ हा स्टेपचं आपोआप आंसर २४x७ हा सायबर बॉट आपल्याला देणार आहे.*

हिंदी दिवस

आज हिंदी दिवस आहे. हिंदी भाषा भारतीय संस्कृतीची वाहिनी असून प्राचीन आणि समृद्ध भाषा आहे. आज नागपुरात या निमित्त अनेक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. आकाशवाणीचे राजभाषा अधिकारी शरद सूर्यवंशी यांनी श्रोत्यांना हिंदी दिवसाच्या शुभेच्छा दिल्या आहेत.

*"आकाशवाणी नागपुर केंद्र से आप सभी श्रोताओं को "विश्व हिंदी दिवस" पर हार्दिक शुभकामनाएं. हिंदी राष्ट्रीय संस्कृति और पहचान है. यह अभिव्यक्ति का सशक्त माध्यम है. आइए इसे दिल से स्वीकार कर गर्व से अपनाये."*

कुंभवाणी

महाकुंभ २०२५ ला समर्पित आकाशवाणीच्या विशेष कुंभवाणी वाहिनीचं उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांच्या हस्ते आज लोकार्पण झालं. प्रसार भारतीचे अध्यक्ष नवनीत कुमार सेहगल, मुख्य कार्यकारी अधिकारी गौरव द्विवेदी यावेळी उपस्थित होते. महाकुंभ जात, पंथ आणि भेदभावाच्या पलिकडे असून, एकतेचा संदेश देत असल्याचं योगी आदित्यनाथ यावेळी म्हणाले.

मनपा आयुक्त तथा प्रशासक डॉ.अभिजित चौधरी

नागपूर पालिकेच्या कर्मचारी भरती प्रक्रिया पुढच्या महिन्यात राबवणार असल्याचे नागपूर महानगरपालिकेचे मनपा आयुक्त तथा प्रशासक डॉ.अभिजित चौधरी यांनी आज सांगितले.

नागपूर महानगरपालिकेतर्फे गेल्या वर्षात राबवल्या गेलेल्या उपक्रमाबद्दल तसेच यावर्षीच्या संकल्पाबद्दल प्रसारमाध्यमांशी ते आज मुख्यालयात संवाद साधत होते. यावेळी त्यांनी पदभरती विषयी माहिती दिली.

*म.न.पा. पद भरणे हा २०२५ मधला एक महत्त्वाचा अजेंडा आहे. जे आपल्याकडे क्रिटिकल पद होती ८३५च्या आसपास पदांना आपल्याला राज्य शासनाने मंजुरी दिली होती. ती आपल्याला पद भरायची होती त्या पदांची भरती जी आहे ती आता आपली प्रोसेस सुरू झालेली आहे आणि फेब्रुवारी महिन्यामध्ये त्याच्या आपण ज्या परीक्षा आहेत त्या घेऊ टीसीएस म्हणजे टाटा कन्सल्टन्सी सर्व्हिसेसच्या अग्रीमेंट झालेल आहे आणि ही त्याच्या ऍडव्हर्सटाईजमेन्ट पब्लिक झालेले आहेत.*

याव्यतिरिक्त आयुक्तांनी सांगितलं की अमृत योजना तसेच जपानच्या जायका कंपनीतर्फे शहरातील सिवरेज मलवाहिन्यांचे दुरुस्तीकरणाचे काम जवळपास 3000 कोटीच्या तरतुदीने सुरू असून यासोबतच तीनशे कोटी रुपयांच्या तरतुदीने सिमेंट कॉंक्रिट रस्त्याचा फेज 2 त्याचप्रमाणे इंटिग्रेटेड ट्रॅफिक मॅनेजमेंट सिस्टीम, नाग नदीचा प्रकल्प असे सर्व प्रकल्प मागच्या वर्षी कार्यादेश मिळून चालू झालेले आहेत. या कामांना या वर्षांमध्ये योग्यरीत्या पुढे नेणं हे आपली प्राथमिकता असल्याचं त्यांनी स्पष्ट केलं. त्याचप्रमाणे सामान्य जनतेला भेडसवणा-या समस्यांना देखील आपण प्रामुख्याने सोडवण्यासाठी मुख्यमंत्र्यांनी 100 दिवसाच्या अजेंडा अंतर्गत निर्देश देण्यात आलेले कामे, संकेतस्थळ अद्ययावतीकरण त्याचप्रमाणे लोक गा-हाणी पोर्टलवर झिरो पेंडन्सी करण्यासाठी नागपूर मनपा कार्यरत आहे, असेही आयुक्तांनी यावेळी आवर्जून सांगितले.

'सौरग्राम'

विदर्भातील पहिला शंभर टक्के 'सौरग्राम' होण्याचा मान आता लवकरच वर्धा जिल्ह्यातील हिंगणघाट तालुक्यातील चिचघाट-राठी या गावाला मिळणार आहे. सौर ऊर्जेच्या प्रकाशात झळकणा-या या गावाने शासकीय निधीची कुठलीही मदत न घेता ही किमया साध्य करणा-या या गावाने संपूर्ण राज्यापुढे एक आदर्श निर्माण केला आहे. महावितरणकडून राज्याच्या प्रत्येक जिल्ह्यातील किमान 2 गावे 100 टक्के सौर ऊर्जेवर नेण्याची मोहीम सुरू असून या मोहिमे अंतर्गत चिचघाट-राठी या गावाची निवड करण्यात आली असून गावातील सौर ऊर्जेची स्थापित क्षमता सुमारे 811 किलोवॅट झाली आहे. वर्धा शहरापासून 40 किमीच्या अंतरावर असलेले आणि महावितरणच्या हिंगणघाट (ग्रामिण) उपविभागा अंतर्गत असलेल्या चिचघाट-राठी येथील गावक-यांनी महावितरणच्या अवाहनाला अनुकूल प्रतिसाद देत केंद्र शासनाच्या 'पंतप्रधान सूर्यघर'– मोफ़त वीज योजनेत सहभागी होत गावाचे शंभर टक्के सौर ऊर्जीकरण करून एकजुटीने 'सौर' उड्डाणाकडे यशस्वी प्रवास सुरू केला आहे.

ऑरेंज सिटी क्राफ्ट मेळा

केंद्रीय सांस्कृतिक मंत्रालयाच्या अखत्यारीतील नागपूरच्या सिव्हिल लाईन इथल्या दक्षिण मध्य क्षेत्र सांस्कृतिक केंद्राद्वारे दरवर्षी आयोजित केला जाणारा 'ऑरेंज सिटी क्राफ्ट मेळा आणि

लोकनृत्य सोहळा' आज पासून ते 19 जानेवारी दरम्यान आयोजित केला जाणार असून या मेळाव्याचं हे 31 वं वर्ष असल्याचं या केंद्राच्या संचालिका आस्था कार्लेकर यांनी सांगितलं. या दहा दिवसीय मेळयामध्ये विविध राज्यांची लोकनृत्यं, हस्तशिल्पप्रदर्शन त्याचप्रमाणे व्यंजनांची दालनं राहणार आहेत. मेळाव्याचं उद्घाटन आज संध्याकाळी साडे सहा वाजता होणार असून दुपारी 2 ते रात्री साडे नऊपर्यंत या मेळाव्यामध्ये नागरिकांना सशुल्क प्रवेश करता येईल. या मेळाव्यामध्ये रोजच संध्याकाळी साडेसहा वाजता विविध राज्यांच्या संस्कृतीचं दर्शन घडवणारी लोकनृत्यं, संगीत यांचे सांस्कृतिक कार्यक्रम होणार असून या मेळाव्यात दोनशेहून अधिक लोकनृत्य आणि आदिवासी कलाकार तसेच दीडशे हस्तशिल्पकार सहभागी होणार आहेत. या कार्यक्रमाला तसेच प्रदर्शनाला भेट देण्याचं आवाहन कार्लेकर यांनी केलं आहे.

जागतिक माजी विद्यार्थी मेळा

लक्ष्मीनारायण इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी ॲल्युमनी असोसिएशन अर्थात लिटा च्या द्विदिवसीय जागतिक माजी विद्यार्थी मेळावा 'कोनेक्ट 24-25' ला उद्या शनिवार, दि. 11 जानेवारीपासून एलआयटी विद्यापीठ परिसर, अमरावती रोड, नागपूर येथे प्रारंभ होत आहे. उद्या दुपारी 3 वाजता 15, 25 आणि 50 व्या बॅचचे रियुनियन आणि बॅच चॅम्पियनचा सत्कार होणार असून दुपारी 4 वाजता 'बॅक टू द अल्मा मेटर' विषयावर पॅनेल चर्चा होईल. सायंकाळी 6 वाजता होणा-या 'बॉलीवूड हंगामा'मध्ये गाण्यांचा जागतिक विक्रम करणारे प्रशांत नासेरी, नाट्य अभिनेत्री अंजली जोशी आणि गायिका ज्योती नालसे सादरीकरण करतील.

*****